Vol 6 Issue 6 Dec 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# वि. वा. शिरवाडकरांच्या नाट्यलेखनातील सामाजिक भान व संदर्भ

गणेश विठ्ठल मोताळे
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यातील ध्रुवतारा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वि. वा. शिरवाडकरांना उर्फ कुसुमाग्रजांना साहित्य क्षेत्रातील अनेकानेक पुरस्कार मिळालेले आहेत. परंतु कोणत्याही पुरस्काराने त्यांच्या प्रतिभेची उंची गाठता आलेली नाही. कारण त्यांचे लेखन मानवाच्या बाह्यसंघर्षापेक्षा आत्मसंघर्षातूनच उभे राहते. म्हणून एक अभिजात दर्जाचा लेखक–कवी–नाटककार म्हणूनही त्यांचा नावलौकिक आहे. मराठी कवितेला आणि नाटकाला एक विशिष्ट वळण देऊन एका उंचीवर घेऊन जाण्याचे कार्य त्यांच्या प्रतिभेने केले आहे. कोणत्याही लेखकाच्या लेखनाचे यशापयश हे त्यांच्या अनुभवाभिव्यक्तीच्या सामाजिक संदर्भात, सजगतेत आणि वास्तवाला भिडण्याच्या संवेदनशीलतेत असते. म्हणून वि. वा. शिरवाडकरांच्या नाट्यलेखनाच्या साफल्याचे गमक शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करावयाचा मानस आहे. शिरवाडकर जेव्हा एखाद्या व्यक्तिरेखेची अथवा नाट्यविषयाची निवड करतात. तेव्हा त्याचा नेमका सामाजिक संदर्भ काय? त्यामागे त्यांची नेमकी भूमिका काय? हा शोध इथे महत्वाचा आहे.



शिरवाडकरांनी आपलया नाट्यलेखन निर्मितीसंबंधी म्हटले आहे की, “मला नाटक नेहमी व्यक्तीत, माणसाच्या स्वभाव धर्मात, त्याने भोवतालच्या परिस्थितीशी केलेल्या संघर्षात सापडलेले आहे.”[1] असे डॉ. वि. भा. देशपांडेंनी शिरवाडकरांचे विधान उद्धृत केलेले आहे. या विधानाचा मतितार्थ शिरवाडकरांच्या सामाजिक संदर्भात मिळतो. शिरवाडकरांच्या लेखनाची मुलद्रव्ये ही समाजाच्या वास्तवातुन व भोवतीच्या अनुभाविक संवेदनेतून घेतात. म्हणून त्यांच्या साहित्य लेखनातील अनुभवाच्या प्रदेशाला कोणत्याही सीमा राहत नाही. या संदर्भात प्रा. विमुक्ता राजे म्हणतात की, “शिरवाडकरांचा हा साहित्यविचार त्यांच्या समग्र साहित्यात, नाटकात व कवितेत विशेषत्वाने दिसून येतो. त्यांच्या नाटकातील प्रमुख व्यक्तिरेखा या ध्येयवेड्या आहेत. जीवनातील अमंगलाला नष्ट करुन मांगल्याचा, सत्याचा, शिवत्वाचा पाठलाग करण्यातच त्यांचा अखेर होत जातो.”[2] याचा अर्थ शिरवाडकर नाट्यकृतीमधील अविष्कृत पात्राधारे जीवनातील उच्च व अंतिम मूल्यांचा शोध घेतात. मानवी जीवनाच्या अतिउच्च मूल्यांचा शोध त्यांच्या लेखनाला एका विशिष्ट उंचीवर घेऊन जाते. कारण त्यांच्या नाट्यलेखनातील पात्र रेखाटने बाह्य संघर्षापेक्षा आत्मसंघर्षाच्या प्रकटीकरणातून विशाल अशा अनंताशी एकरुप होताना दिसतात. सामान्य माणसाचा असामान्यत्वापर्यंतचा झालेला व्यक्तिविकास दाखविणे हाच त्यांच्या लेखनाचे बिज असल्याचे दिसून येते.

शिरवाडकरांची जीवनदृष्टी ही मानवतावादी व एका व्यापक वैचारिक भूमिकेची होती. त्यांच्या विचारांवर म. फुलेसारख्या महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. याचा निर्वाळा ते स्वतः देतात. हा संदर्भ डॉ. लुलेकर उद्धृत करतात. या संदर्भात ते म्हणतात की, “मी फुल्यांच्या विचारात वावरत होतो, ते विचार म्हणजे माझ्या मतांचा नव्हे तर माझ्या व्यक्तिमत्वाचा एक अविभाज्य भाग होते.”[3] अर्थातच शिरवाडकर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्टीने अधिक व्यापक भूमिका घेतात. या वैचारिक दृष्टीनेच ते मानवी जीवनाच्या समग्रतेचा शोध लेखणीद्वारे घेतात. माणसामध्ये, त्याच्या स्वभावामध्ये व प्राप्त स्थितीत त्याने केलेल्या संघर्षामध्ये शिरवाडकरांना नाट्यबीज सापडली आहे. अशांत असंत असताना माणसे जगतात कशी? साध्य–साधनाचा विवेक संपल्याने मूल्य ऱ्हास कसा होत गेला? समाज विघटन कसे होते? आत्मकेंद्री आणि स्वार्थी प्रवृत्तीतून शोषणाच्या संधीचा शोध, परिवर्तनाच्या पोकळ वल्गना, संवेदनाहीनता, जगण्यातील अगतिकता, असुरक्षितता, असहायता आदी जाणिवांचे अस्तित्व, भावनिक निष्ठुरता, मानवी आशा–आकांक्षेचे मातेरे, मनाची कुंठितावस्था, अपरिहार्य माणसांची सहनशीलता या सर्व आशयद्रव्यांचा शोध शिरवाडकरांची लेखणी संज्ञाप्रवाही व मनोविश्लेषणाच्या पातळीवर घेण्याचा प्रयत्न करते. कारण ते प्रथम कवी असल्याने त्यांना माणसाचे मन हे अधिक महत्वाचे वाटते.

मानवी मनाचे परिस्थितीसापेक्ष चिंतन शिरवाडकरांनी मराठी रंगभूमीवर सर्वप्रथम व प्रभावी मांडण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीसापेक्ष माणसाचे जगणे, त्याच्या मनातील संतप्त वादळाचा वाङ्मयीन मूल्ययुक्त शोध शिरवाडकर आपल्या नाटकातून घेतात. त्यातून आपल्या भोवतालच्या वास्तवाचे, त्यात जगणाऱ्या माणसाच्या स्वभावाचे सगळे अंतःसंघर्ष रंगभूमीच्या प्रेक्षकांना नवा प्रत्यय देत होते. स्वतःच्या जगण्याचे तत्वज्ञान आणि प्राप्त परिस्थिती यांविषयीचे मनातील द्वंद्व या द्वंद्वातूनच उभा राहिलेला हा मनोसंघर्ष असतो. अशाच मनोसंघर्षातील नाट्य शोधणे आणि जगण्याची तडफड अविष्कृत करणे. हे शिरवाडकरांच्या लेखणीचे बलस्थान व नाट्यसृष्टीचे वेगळेपण आहे, असे म्हणता येईल. शिरवाडकरांनी एकूण 18 नाट्यकृती मराठी रंगभूमीला दिलेल्या आहेत. त्यातील दुसरे

दिवे, वैजयंती, आमचं नाव बाबूराव, ययाती आणि देवयानी, एक होती वाघीण ही पाच नाटके सुखात्मिका आहेत. तर दुसरा पेशवा, कौंतेय, राजमुकुट, ऑथेल्लो, वीज म्हणाली धरतीला, बेकेट, नटसम्राट, विदुषक, आनंद, मुख्यमंत्री, चंद्र जिथे उगवत नाही, महंत, कैकेयी इ. तेरा नाटके शोकांतिका आहेत. याचा अर्थ शिरवाडकरांचे नाटक मनाच्या संघर्षातून उगवते. म्हणून त्यात शोकांत निर्माण होतो. शोकांतिकेच्या पातळीवर शिरवाडकरांची लेखणी जरी शेक्सपीअर, गडकऱ्यांशी नाते सांगत असली तरी शोकांतिकेचे स्वरूप व कारणभिन्नतेमुळे शिरवाडकरांचे शोकांत लेखन एका वेगळ्या पातळीवर घेऊन जाते. शेक्सपीअर खल व्यक्तिरेखेधारे शोकांत निर्माण करतात. परंतु शिरवाडकरांची लेखणी सभोवतालच्या एकूण परिस्थितीलाच खलत्त्व बह ाल करते. यासंबंधी व. दि. कुलकर्णी लिहितात की, ''शिरवाडकरांच्या शोकांतिका भीषण नाहीत, त्या अधिक करूण गंभीर आहेत. त्या दैवी नाहीत, अधिक मानवी आहेत. त्या संमिश्र–जटिल गुढ नाहीत, त्या सरळ पण खोल आहेत.''[4] अर्थातच शिरवाडकरांच्या शोकांतिका प्रेक्षकांना एका वेगळ्या उंचीवरुन खाली फेकतात. कारण शिरवाडकरांच्या शोकांतिकेचे रहस्य हे एखादी कोपाविष्ट देवता, दुष्ट दैव किंवा खलत्व नसून प्रत्येक माणसाच्या दोषात्मक मनोधर्मात दडलेले आहे. एखाद्या मूल्यसंघर्षात आणि श्रेयसाच्या स्वीकृतीत असते. म्हणून शिरवाडकरांची शोकांतिका वेगळी ठरते.

शिरवाडकरांच्या साहित्यलेखनीतील तत्वज्ञान हे संपूर्ण मानवतेला कवटाळण्याचा प्रयत्न करताना दिसते. त्यांचे लेखनच मानवी जीवनातील संघर्षापासून सुरु होते. या संघर्षातूनच विकास, –हास आणि पुन्हा विकास असे सृष्टीचे चक्र चाललेले असते. हे संघर्ष विसंवादातून विसंगतीतून, मूल्य परिवर्तन, विचारांचे वेगळेपण, जाणिवांचे वैविध्य संवेदनेचे भेद आदींमधूनही येतात. शिरवाडकरांच्या नाटकातील संघर्ष एक व्यक्तिविरुध्द दुसरी व्यक्ती, व्यक्तिविरुध्द समूह, समुहाविरुध्द समूह, दोन मनांचा भेद यामुळे निर्माण होतो. तो संघर्ष घेऊन व्यक्तिरेखा उभी राहते. वास्तवाभास निर्माण करणाऱ्या व्यक्तिरेखा याच नाट्यकृतीच्या बलस्थानी ठरतात. या संदर्भात डॉ. लुलेकर म्हणतात की, ''त्यांच्या सर्व नाटकांना केवळ व्यक्तिरेखा केंद्रीत झाल्याचे समजून आकलन करता येत नाही. त्यासोबतच त्यांना असलेला व्यापक सामाजिक संदर्भ महत्त्वाचा आहे. भारतीय सामाजिक संरचनेत असणारे नातेबंध आणि आधुनिकतेचे सामाजिक भान त्यांना नाटकातून अविष्कृत करावयाचे आहेत. या साऱ्यांचा व्यामिश्र अनुभव ते आपल्या नाटकामधून गोचर करतात.''[5] अर्थात विशिष्ट सामाजिक आशयाला घेऊन शिरवाडकर संघर्ष उभा करतात. हा संघर्ष घेऊन येणाऱ्या व्यक्तिरेखा एकट्या येत नाही. तर फार मोठा सामाजिक व वास्तवाभिमुख संदर्भ त्या समोर मांडतात.

समाजजीवनाच्या, व्यक्तिजीवनाच्या तळापर्यंत शोध घेऊन त्याचे सांस्कृतिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक संचित तपासणे असा त्यांचा लेखक म्हणून असलेला प्रवास एकदा लक्षात आला की, त्यांच्या लेखनाचे आकलन करुन घेणे सोपे जाते. भारतीय समाजजीवनासमोर असलेले आचार–विचारांचे आदर्श उच्चतम मूल्यांचे आहेत. विशेषतः गांधी विचारांचे संस्कार शिरवाडकरांवर झालेले असल्याने त्याची तपासणी ते वर्तमानात करतात, त्या मूल्यांचा शोध घेतात.

थोडक्यात, म्हणजे सामान्य माणसांमधील असामान्यत्वाचा शोध, सामाजिक आकलनासाठी वर्तमानाचे भान, बदलत्या काळाशी जोडलेले नाट्यसंवेदन या दृष्टीने लेखक भोवतीच्या जीवनाचे आकलन व अन्वेषण करीत असतो. त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या दृष्टीने शिरवाडकरांच्या सर्व नाटकाचा विचार करता येतो. त्यांच्या ऐतिहासिक, पौराणिक, रुपांतरित, स्वतंत्र नाटकाचे कथानक अशा अन्वयार्थातूनच आलेले आहेत, असेच म्हणावे लागते.

### *संदर्भ सूची :*

1.देशपांडे वि. भा., मराठी नाटक : स्वातंत्र्यकाल, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1992, पृ. 15.
2.दैनिक सामना वृत्तपत्र, संपादकीय, दि. 27 फेब्रुवारी 2015, पृ. 4.
3.अंबिके मेघा (संपा.), समन्वयवादी (डॉ. बाबूराव गायकवाड गौरवग्रंथ), मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2014, पृ. 175.
4.अकोलकर ग. वि. व इतर (संपा.), साहित्य समीक्षा, चेतश्री प्रकाशन, अंमळनेर, द्वितीया आवृत्ती, 1993, पृ. 209.
5.अंबिके मेघा (संपा.), समन्वयवादी (डॉ. बाबूराव गायकवाड गौरवग्रंथ), मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2014, पृ. 179.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org